19

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे याचे कार्यालय, जुनी पी.एम.टी. बिल्डिंग, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे-४११ ०३७, दूरध्वनी क्रमांक २४४४५८६४, फॅक्स २४४४२६८५.

-6 SEP 2010

आवक क्रमांक १८०६९

विषय- श्री. राजेंद्र मंगरुळकर, यांचे विरोधात मा. लोकआयुक्त तसेच मुख्य सचिव यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत.
(सिम्बॉयोसीस सोसायटी, पुणे)

क्रमांक कक्ष-१/जमीन/प्र.क्र.१२६/698 /२०१०-११
पुणे ४११ ०३७, दिनांक 25 ऑगस्ट, २०१०.

प्रति,

**मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**संदर्भ** आपलेकडील पत्र क्रमांक कक्ष-१७/ नोसेल/२/ आयडी/ २००९-१०/ १७७७, दिनांक ५.१.२०१०.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मागविणेत आलेला अहवाल वनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-६/ जमीन/३१ दिनांक ६.४.२०१० अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेला आहे, सदर अहवालाचे अनुषंगाने व या कार्यालयाकडील उपलब्ध माहितीच्या अधारे आपण निर्देशित केलेप्रमाणे सविस्तर टीपणी तयार करुन वनसंरक्षक, पुणे यांचे अहवालासह सोबत जोडली आहे.

तसेच श्री. मनीषकुमार सिंग यांनी श्री. राजेंद्र मंगरुळकर व श्री. बी. के. सिंग या दोघांनी प्रकरणी घेतलेल्या भूमिकेबाबत नोंदविलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने या कार्यालयाकडुन तर्क लावणे किंवा निष्कर्षाप्रत येणे संयुक्तीक होणार नाही असे या कार्यालयाचे मत आहे. प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती टीपणीमध्ये नमूद असल्याने कृपया अवलोकन होऊन पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

सहपत्र-वरील प्रमाणे.

(अ. सु. कु. मिश्रा)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.

प्रत- वनसंरक्षक पुणे वन विभाग, पुणे. यांचेकडे त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-६/ जमीन/३१ दिनांक ६.४.२०१० चे अनुषंगाने माहितीसाठी अग्रेषित.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.

Symbiosis-RajendraMangrulkar

# टीपणी

# सिम्बॉयोसिस सोसायटी

- मौजे भांबुर्डा (पुणे) सर्व्हे नंबर ८१ व ९४ मधील क्षेत्र हे शासकीय अधिसूचना क्रमांक २४ एफ दिनांक १.३.१८७९, ४३७५ दिनांक जून १८९० व ५९७१ दिनांक ८.८.१८९५ नुसार राखीव वन म्हणून घोषित झालेले आहे.

- मौजे भांबुर्डा येथील सर्व्हे नंबर ८१ मधील क्षेत्रापैकी ३.२६ हेक्टर क्षेत्र सिम्बॉयोसिस सोसायटी, पुणे यांना वृक्ष लागवडीसाठी महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक टीआरएस/ १८७३/ ७३८४२/फ-५ दिनांक ७.१०.१९७५ अन्वये काही अटी व शर्तींच्या अधिन राहून ५० वर्षे मुदतीसाठी देण्याचा निर्णय घेणेत आला. परंतु, पुढे यात बदल करणेत येऊन सदर क्षेत्रापैकी ०.६० हेक्टर क्षेत्र वनीकरणासाठी देणेबाबतचा नवीन निर्णय शासनाकडून पत्र क्रमांक एफएलडी-१९८१/ २०१५/ फ-३ दिनांक ३१.५.१९८५ अन्वये घेणेत आला.

- त्यानुसार वनविभागाकडून सदर संस्थेसोबत दिनांक १.९.१९८६ रोजी भाडेपट्टा तयार करणेत आला होता. त्याप्रमाणे सदर संस्थेने १९९५ पर्यंत भाडेपट्टयाची रक्कम वनविभागाकडे जमा केली.

- त्यानंतर उपवनसंरक्षक, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ब/ कक्ष-३/ जमीन/ १४३७ दिनांक १८.८.१९९९ अन्वये सदरचा करार वन (संवर्धन) अधिनियम १९८० अन्वये रद्द केला असून याबाबतचे भाडे स्विकारता येत नाही असे सदर संस्थेस कळविले. तसेच याबाबतचा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गतचा प्रस्ताव वनविभागाकडे दाखल करणेस कळविले

- प्रस्तुत क्षेत्राचे बाजूने सेनापती बापट मार्ग हा अती रहदारीचा रस्ता आहे. सदर रस्ता रूंदीकरणाचा प्रस्ताव (स.न. ९४ मधील क्षेत्र ०.१६३) महानगरपालीकेतर्फे वनविभागाकडे दाखल केला होता. त्यास केंद्र शासनाकडील पत्र क्रमांक ८-डी/०५/ २००३/ एफसीडब्ल्यु/६७२ दिनांक ११.३.२००३ अन्वये अंतीम मंजूरी प्राप्त झाली आहे. तदनंतर महानगरपालिका, पुणे मार्फत सदर रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेतले त्यात सदर संस्थेची खाजगी जागा महानगरपालिका,पुणे यांचेकडून वापरणेत आली. त्यामुळे संस्थेकडून अपरिहार्य कारणामुळे वाहनतळासाठी स.न. ९४ मध्ये डांबरीकरण करून अतिक्रमण केले गेले. असे सदर संस्थेचे म्हणणे आहे.

- सदर संस्थेने वरीलप्रमाणे अतिक्रमण केलेचे निदर्शनास येताच वनपाल, भांबुर्डा यांनी भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६-ड अन्वये दिनांक २७.६.२००३ रोजी प्रथम पी.ओ.आर. नोंदविला.

- तदनंतर ०.६० हेक्टर क्षेत्राचा वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव उप वनसंरक्षक, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक A/ Desk-3/ Land/ FCA Pro / 1178 Dt 5.3.2004 अन्वये या कार्यालयास प्राप्त झाला. (यापुर्वी सदर संस्थेकडून दिनांक २५.६.२००३ रोजी उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडे याबाबतचा प्रस्ताव दाखल केला होता; परंतु तो तांत्रिक अडचणीमुळे व न्यायीकदृष्टीकोनातून उपवनसंरक्षक, पुणे यांनी त्यांचे स्तरावर नस्तीबद्ध केल्याचा उल्लेख त्यांचे अहवालात नमूद आहे.)

- सदर प्राप्त प्रस्ताव या कार्यालयाकडून तपासला असता त्यात ब-याच तृटी असल्याचे निदर्शनास येताच तो तृटी पूर्ततेसाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१/ड/ जमीन/ ४६५२ दिनांक २६.३.२००४ अन्वये उप वनसंरक्षक, पुणे यांचेकडे परत पाठविला.

- तदनंतर ०.६० ऐवजी ०.७४४६ हेक्टर क्षेत्राचा प्रस्ताव उपवनसंरक्षक, पुणे यांनी पत्र क्रमांक A/ Desk-3/ Land/ 1265 Dt 18.2.2005 अन्वये या कार्यालयास सादर केला.

- सदर प्रस्ताव या कार्यालयाकडून तपासला असता त्यात ब-याच तृटी असल्याचे निदर्शनास येताच तो तृटी पूर्ततेसाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/ ३८७२दिनांक ११.३.२००५ अन्वये उप वनसंरक्षक, पुणे यांचेकडे परत पाठविला

- सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी मिळणेपुर्वीच प्रस्तावित क्षेत्रावर सदर संस्थेकडून तार कंपाऊंड घालण्यात आले. तसेच स.न. ८१ व ९४ च्या क्षेत्राची भूमि अभिलेख विभागाकडून मोजणी होऊन हद्दी निश्चित झाल्यावर सदर संस्थेकडून स.न. ८१ व ९४ मध्ये अतिक्रमण झालेचे वनपाल, भांबुर्डा यांचे निदर्शनास आल्याने त्यांनी दिनांक ११.६.२००५ अन्वये दुसरा पी.ओ.आर नोंदविला.(प्रथम पी आर ओ नोंदविलेवेळी स.न. ८१ व ९४ च्या क्षेत्राची भूमि अभिलेख विभागाकडून मोजणी होऊन हद्दी निश्चित झाल्या नव्हत्या.)

- उपवनसंरक्षक, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-३/ जमीन/ ११२५ दिनांक ३०.९.२००५ अन्वये सदरच्या प्रस्तावातील तृटी दूर करून फेर प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला.

- सदर प्रस्तावात समाधानकारक तृटी पूर्तता झाल्याने तो या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/ १०६९ दिनांक ६.१२.२००५ अन्वये मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे पाठविला.

- पुन्हा त्यात मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-१७/ नोसेल/ २/ प्रक्र. ११३४६/ १७२० दिनांक २३.१.२००६ अन्वये तृटी निर्देशित करून पुर्ततेसाठी या कार्यालयाकडे परत पाठविला

- त्याप्रमाणे या कार्यालयाकडून पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन / ३८०३ दिनांक ३.२.२००६ अन्वये सदर प्रस्ताव तृटी पूर्ततेसाठी वनसंरक्षक, पुणे यांचेकडे परत केला.

- उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-३/ जमीन/ ८ दिनांक ४.४.२००६ अन्वये सदर प्रस्ताव तृटीपुर्ततेसह या कार्यालयास सादर केला.

- त्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/प्रस्ताव-३४/ ५६ दिनांक २०.४.२००६ अन्वये मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे पाठविला.

- सदर प्रस्तावाचे अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडून १ ते ३ मुद्याबाबतचा खुलासा पत्र क्रमांक कक्ष-१७/ नोसेल/ २/ प्रक्र. ११३४६/ २२४ दिनांक १६.५.२००६ अन्वये मागविणेत आला होता. त्याप्रमाणे सदरचा खुलासा उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडून प्राप्त करून घेऊन तो या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/प्रस्ताव-३४/ २०७ दिनांक २१.५.२००६ अन्वये मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे पाठविला.

- याशिवाय प्रकरणी मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांनी त्यांचेकडील अर्ध शासकीय पत्र क्रमांक कक्ष-१७/ नोसेल/ २/ प्रक्र. ११३४६/ ३२१ दिनांक ३१.५.२००६ अन्वये १ ते ५ मुद्दे निर्देशित करून वेगळ्याने अहवाल मागविणेत आला होता. याबाबतचा खुलासा उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-३/ जमीन/ ३९८ दिनांक १३.६.२००६ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाला. त्याप्रमाणे या कार्यालयाचा अहवाल पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/प्रस्ताव-३४/ ३१२ दिनांक १५.६.२००६ अन्वये मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे पाठविला.

- तदनंतर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-१७/ नोसेल/ २/ प्रक्र. ११३४६/ ३९५ दिनांक १३.६.२००६ अन्वये सदर संस्थेविरूद्ध न्यायालयात खटला दाखल करून प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या वन अधिकारी / कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशी त्वरीत सुरू करावी असे निर्देशित केले. त्याप्रमाणे या कार्यालयाकडून पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/प्रस्ताव-३४/ १२०२ दिनांक २८.६.२००६ अन्वये उपवनसंरक्षक, पुणे यांना निर्देश दिले. तदनंतर शासनाने पत्र क्रमांक एफएलडी-१९०६/ प्र.क्र.५५३/ फ-१० दिनांक २५.७.२००६ अन्वये प्रकरणी कोणतीही न्यायालयीन कार्यवाही करू नये असे निर्देश दिल्यामुळे याबाबत येथेच थांबावे लागले.

- प्रकरणी या कार्यालयाकडून पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/प्रस्ताव-३४/ ३१२ दिनांक १५.६.२००६ अन्वये मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांना सादर करणेत आलेल्या अहवालात प्रस्तावित क्षेत्राचे मालमत्ता मूल्य (NPV) चालू बाजारभावाने वसूल करणेस अनुमती मिळणेबाबत विनंती केली होती. त्याप्रमाणे उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडून चालू बाजारभावाचा दर तक्ता व त्याप्रमाणे प्रस्तावित क्षेत्राची परिगणित होणारे मालमत्ता मूल्य (NPV) मागविणेत येऊन ते मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे पाठविले. परंतु याबाबत सदर संस्थेने असमर्थता दर्शवून सदर नियमबाह्य अट रद्द करणेबाबत शासनाकडे निवेदन दिले. त्यानुसार शासनाने वनविभागाकडून अहवाल मागविला. वनविभागाने सदर संस्थेच्या विनंतीला सहमती दर्शविणारा अहवाल सादर केला. त्यामुळे हा विषय इथच संपला. व नियमानुसार कार्यवाही सुरू झाली.

- अंतिमत: सदरचा प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक Desk-17/ NC/2/ ID 11346/ (9)/2370 dt. 27.12.2008 अन्वये महाराष्ट्र शासनास सादर केला.

- महाराष्ट्र शासनानी सदरचा प्रस्ताव त्यांचेकडील पत्र क्रमांक FLD-1907/ CR-261/ F-10 dt. 21.2.2009 अन्वये केंद्र शासनाकडे (भोपाळ कार्यालय) पाठविला.

- त्यावर भोपाळ कार्यालयाकडून प्रस्तावित क्षेत्र resurveyed करून required fresh area व त्याचा map मागविला. त्याप्रमाणेची माहिती उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडून प्राप्त करून घेऊन ती या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१/ जमीन/ प्रस्ताव-३४/ १०१४ दिनांक ४.११.२००९ अन्वये मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे पाठविली. ती त्यांनी पत्र क्रमांक कक्ष-१७/ नोसेल/ २/ आयडी ११७४८ / (४०)/१४२१ दिनांक १९.११.२००९ अन्वये महाराष्ट्र शासनाकडे पाठविली. त्यात resurveyed करून required fresh area 0.7446 व त्याचा map यांचा समावेश आहे.

- पुढील कार्यवाही भोपाळ कार्यालयाकडून चालू आहे. तसेच प्रस्तुत प्रकरण सर्वोच्च न्यायालयाचे सी. ई. सी कमिटीपुढे पुढील आदेशार्थ आहे.

तसेच श्री. मनीषकुमार सिंग यांनी श्री. राजेंद्र मंगरूळकर व श्री. बी. के. सिंग या दोघांनी प्रकरणी घेतलेल्या भूमिकेबाबत श्री. राजेंद्र मंगरूळकर, तत्कालीन सहसचिव (वने), मंत्रालय, मुंबई याची कन्या व तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांचा मुलगा, मुलगी व इतर तीन नातेवाईक यांना सदर संस्थेमध्ये विनामूल्य प्रवेश मिळाला असल्याचा आक्षेप घेतला आहे. त्या अनुषंगाने वनसंरक्षक, पुणे यांनी सदर संस्थेकडून संबंधीतांचे प्रवेशाबाबतची माहिती मागविली होती. ती सदर संस्थेकडून दिनांक १९.२.२०१० चे पत्रान्वये वनसंरक्षक, पुणे यांचेकडे प्राप्त झाली आहे. ती सोबत जोडली आहे.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.